# प्रेसनोट दि. २०/०९/२०१८

## सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांचे कडुन पंचतारांकित हॉटेल वर छापा टाकुन मध्यप्रदेश राज्यातील एका महिलेची हायप्रोफाईल वेश्याव्यवसायातुन सुटका

दि.१९/०९/२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक तुषार आल्हाट यांचे कडुन गणेश बिष्टा हा वेगवेगळ्या पंचतारांकित हॉटेल मध्ये विविध राज्यातील हायप्रोफाईल मुलींना जादा पैशाचे अमिष दाखवून वेश्याव्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली.

त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे व विभागाकडील अधिकारी, कर्मचारी यांनी कारवाई करून बंडगार्डन रोडवरील पंचतारांकित हॉटेल येथे वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान मध्यप्रदेश राज्यातील एका सज्ञान मुलीची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन तीला वेश्या व्यवसायास लावणारा गणेश भिम बिष्टा वय ३६ वर्षे रा. इंदुमती सोसायटी, सोमनाथ नगर, वडगाव शेरी पुणे मुळ रा. गोलमा चौक, तालुका जि उदलगुडी राज्य आसाम याचे विरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर २६४/२०१८ इटपा ॲक्ट १९५६ चे क. ३,४,७, सह भादंवि कलम ३७०, ३७० अ, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी गणेश बिष्टा यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ४०००/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलीला रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, सपोनि अनिता खेडकर, तुषार आल्हाट, नामदेव शेलार, राजाराम घोगरे, नितिन तरटे, कविता नलावडे, सुप्रिया शेवाळे, सुनिल नाईक, सचिन कदम, निलेश पालवे,राजेद्र कचरे, सचिन शिंदे यांनी कारवाई केली आहे.

Scanned by CamScanner